पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक १५

**सभावृत्तांत**

दिनांक - ०३/०१/२०१४ वेळ – दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०३/०१/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहूल – **सभापती**
२) मा. प्रशांत शितोळे
३) मा. शितोळे शैलजा बाबुराव
४) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.टेकाळे, मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.लडकत – कार्यकारी अभियता, डॉ.मनोज देशमुख – वैद्यकीय अधिक्षक, मा.पाटील – प्रशासन अधिकारी (प्रशा.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.३ : नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या अपंग कल्याण योजनेतील विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुधारित बदल करणेबाबत.

विषय क्र.४: प्रभाग क्र.२३ चिंचवड येथील आरक्षण क्र.२२७ सिटी सर्व्हे नं.९६५ येथे तालेरा रुग्णालयाचे इमारतीचे काम करणेचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.शैलजा शितोळे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५: नगरसचिव विभागासाठी नविन टाटा सुमो वाहन खरेदी करणेबाबत - मा.शैलजा शितोळे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम हॉस्पिटल मधीत पोस्टमार्टेम विभागात काम करणा-या कर्मचा-यांना कामकाज देणेबाबत – मा.प्रशांत शितोळे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७: प्र.क्र.५३ मधील पश्चिम बाहयवळण मार्गावरील स.नं. १५६ पासून वाकडकर वस्तीकडे जाणारा रस्ता विकसित करणेबाबत – मा.शैलजा शितोळे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८: सहा.समाज विकास अधिकारी पदावर काम करणा-या कर्मचा-यास पदोन्नती देणेबाबत – मा.प्रशांत शितोळे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक : १८८ विषय क्रमांक : १
दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग – ड मुख्यालय स्थापत्य
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/ड.मु./१/कावि/२४७६/२०१३, दि.०९/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

थेरगाव गावठाण रस्ता विकसीत करणेकामी येणा-या र.रु.१,८७,५०,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी सत्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १८९ विषय क्रमांक : २
दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग – अ प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/अप्र/कावि/२४६८/२०१३, दि.१८/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.१५ मधील अंतर्गत रस्त्यांना स्टॉर्म वॉटर पाईप लाईन टाकणेकामी येणा-या र.रु.४९,९८,४४०/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख अठ्ठयाण्णव हजार चारशे चाळीस फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : १९० विषय क्रमांक : ३
दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग – नागरवस्ती विकास योजना
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नावियो/५/कावि/१७७/२०१३, दि.२६/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून अपंग कल्याणकारी योजनेतील विविध कल्याणकारी योजनेमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते २ योजनांना मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १९१ विषय क्रमांक : ४

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.शैलजा शितोळे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२३ चिंचवड येथील आरक्षण क्र.२२७ सिटी सर्व्हे नं.९६५ येथे तालेरा रुग्णालयाचे इमारतीची कामे करणे या कामाच्या अंदाजपत्रकीय र.रु.४९,९८,४००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १९२ विषय क्रमांक : ५

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.शैलजा शितोळे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंवचड महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागाकडे सध्या अस्तित्वात असलेले एमएच १४ - ९५८० टाटा सुमो वाहन हे खुप जुने झाले असून त्यांची वारंवार दुरुस्ती करावी लागते. त्यामुळे कार्यालयीन कामकाजामध्ये व्यत्यय येत असल्याने नगरसचिव विभागासाठी एक नविन टाटा सुमो वाहन (TATA Sumo Gold CX PS BS IV) मे.टाटा मोटर्स लि. यांचेकडून थेट पध्दतीने खरेदी करणे व त्याकामी शासकीय दराने येणारा खर्च र.रु.५,६७,५८२/- ( अक्षरी र.रु.पाच लाख सदुसष्ट हजार पाचशे ब्याऐंशी फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १९३ विषय क्रमांक : ६

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा. प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी श्री.संभाजी भिमा शिंदे, सफाई कामगार, विभाग – पोस्टमार्टेम वायसीएम हॉस्पिटल, पिंपरी व या विभागाच्या कर्मचा-यांबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार ( रिट पिटीशन क्रमांक २८८१/२०१२) कामकाज व्हावे व त्याप्रमाणे सदर व इतर पात्र कर्मचा-यांस पदाप्रमाणे नेमणूक व्हावी याकरीता सदर प्रस्ताव मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा अशी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १९४ विषय क्रमांक : ७

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा. प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.शैलजा शितोळे, मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

प्र.क्र.५३ मधील पश्चिम बाह्यवळण मार्गावरील स.नं. १५६ पासून वाकडकर वस्तीकडे जाणारा १८.०० मी. डी.पी.रस्ता विकसित करणे या कामाच्या नावाचा महानरगपालिकेच्या मंजूर

अर्थसंकल्पमध्ये समावेश नाही. सदर कामाचे सन २०१३-१४ च्या मनपाच्या सुधारित अर्थसंकल्पात व्हिजन २००५ या लेखाशिर्षा अंतर्गत समावेश करुन आवश्यक तरतूद उपलब्ध करणेच्या कार्यवाहीस अधिन राहून सदर कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.३,०५,२२,०००/-(अक्षरी र.रु.तीन कोटी पाच लाख बावीस हजार फक्त ) प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १९५ विषय क्रमांक : ८

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा. शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

समाजसेवक पदावरुन सहा.समाज विकास अधिकारी, सहाय्यक समाज विकास अधिकारी पदावरुन समाज विकास अधिकारी असा पदोन्नतीने सोपन असल्याने सहाय्यक समाज विकास अधिकारी या पदावर ३ वर्षे काम करणा-या कर्मचा-यांस समाज विकास अधिकारी वर्ग – २ या पदावर पदोन्नती देऊन अशी अर्हता ठरविणेस व सदर पद १००% पदोन्नतीने भरणेस तसेच समाज विकास अधिकारी हे वर्ग – २ चे पद रिक्त झाले आहे. त्यामुळे सदरचे पद तातडीने भरणेत यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १० /२०१४
दिनांक - ०६ / ०१ / २०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.